सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ४२६ ठ. क्र. ३४१
दि. १८।३।१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. २८ ब साई विहार सुभद्राबाई मंगल कार्यालयाचे शेजारी पिण्याच्या पाण्याची ६ इंची पाईप लाईन टाकणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव तयार करण्यात आलेले सदर कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. १३३ सन २०१५-१६ र.रु. १५,९४,६५५/- यांस मा. स्थापत्य समिती मार्फत मा.म.न.पा. सभेकडे मान्यतेसाठी शिफारस करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २-२-१६ टिपणीने आलेल्या प्रकरणी मा. स्थापत्य समिती ठराव क्र. २१८, दिनांक ८-३-१६ अन्वये मा.म.न.पा.कडे मान्यतेस्तव शिफारसीनुसार आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

प्र. क्र. २८ व २९ ब साई विहार सुभद्राबाई मंगल कार्यालयाचे शेजारी पिण्याच्या पाण्याची ६ इंची पाईप लाईन टाकणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव तयार करण्यात आलेले सदर कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. १३३ सन २०१५-१६ र.रु. १५,९४,६५५/- यांस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४२७ ठ. क्र. ३८२ दि. १८/३/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



प्र.क्र. २६ अ कोनापूरे चाळ, समाजमंदिर येथे कंपौंडवॉल व पेव्हर ब्लॉक रंगरंगोटी शौचालय बांधणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव तयार करण्यात आलेले कामाचे पूर्वगणनपत्रक क्र.७/२/१२१ र.रु. १८,७१,८५०/- यांस मा. स्थापत्य समितीची शिफारस मिळून मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २०-२-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी मा. स्थापत्य समिती ठराव क्र. २७१, दिनांक ८-३-१६ चे शिफारसीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सदर प्रकरणी संपूर्ण माहिती व अहवालासह प्रकरण फेर सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४२८ ठ. क्र. ३८३
दि. १८/३/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

४२८

प्र.क्र. १८ ब्रम्हनाथ नगर येथील किरण टेलर दुकान ते गाली घरापर्यंत व सिध्दार्थ कृपा घर ते किरण टेलर पर्यंत पिण्याचे पाण्याचे पाईप लाईन टाकणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव तयार करण्यात आलेले पूर्वगणनपत्रक क्र. सन २०१५-१६ र.रु. १६,४९,४५०/- यांस मा. स्थापत्य समितीची मान्यता मिळून मा. सर्वसाधारण सभेची मंजूरी मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. १-३-१६ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. २८०, दि. ८-३-१६ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४२९ ठ. क्र. ३४४
दि. ९/३/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



उजनी ते सोलापूर एन.टी.पी.सी. पाईप लाईन वरुन सोरेगांव जलशुध्दीकरण केंद्र येथे जोडणीकरण कामाबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव तयार करणेत आलेले फेर पुर्वगणनपत्रक क्र. १ सन २०१५-१६ र.रु. ६८,७६,८०१/- यांस मा. स्थापत्य समितीची शिफारस होऊन मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २०-२-१६ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. २८४, दि. ८-३-१६ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 432 ठ. क्र. 384
दि. 9/8/3/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



प्रभाग क्र. ५० मध्ये ब्रम्हदेव नगर होटगी रोड ते बादशा खान चौक ते लोकमान्य नगर ते औद्योगिक वसाहत पर्यंत रस्ता सिमेंट काँक्रीट करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र. २०१५-१६ र.रु. ३२,६१,०६४/- चे तयार करणेत आले असून सदरकामी येणारा खर्च सन २०१६-१७ चे भांडवली कामे करणे / शासन अनुदान या बजेट सदरातून र.रु. ३२.६१ लाख तरतूद उपलब्ध होऊन मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २-२-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सदरचे पूर्वगणनत्रक क्र. २०१५-१६ र.रु. ३२,६१,०६४/- यांस मान्यता देणेत येत असून, याकामी सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ४३४ ठ. क्र. ३४६
दि. १८।३।१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



प्रभाग क्र. ५० मध्ये आंबेडकर नगर ते लोकमान्य नगर पिण्याचे पाण्याची पाईप लाईन घालणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र. २०१५-१६ र.रु. ६,९९,९६३/- चे तयार करणेत आले असून सदरकामी येणारा खर्च सन २०१६-१७ चे भांडवली कामे करणे / शासन अनुदान या बजेट सदरातून र.रु. ७.०० लाख तरतूद उपलब्ध होऊन मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १-३-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सदरचे पूर्वगणनपत्रक क्र. २०१५-१६ र.रु. ६,९९,९६३/- यांस मान्यता देणेत येत असून, याकामी सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ४५२ ठ. क्र. ३२८
दि. १८/३/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

४५२

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकामध्ये मा.महापौर, मा. उपमहापौर, मा.सभापती स्थायी समिती, मा.सभागृहनेते, मा.विरोधी पक्षनेता यांचे नावे तरतूद करुन ठेवलेल्या विकास निधीची रक्कम पाणी टंचाई निवारण करण्याकरिता करावयाच्या कामाकरिता वर्ग करण्यात यावी. सदर पाणी टंचाई निवारण कामामध्ये प्रत्येक प्रभागात ४ बोअर मारणे सदर बोअरवर सब मर्सिबल पंप बसविणे व त्या बोअरचे देखभाल दुरुस्ती करणे तसेच सोलापूर शहरातील विहींरीचा सर्व्हे करुन ज्या विहीरींना पुरेसे पाणी आहे अशा विहीरी अधिग्रहण करुन सोलापूर शहर पाणी पुरवठा संबंधी जरुर त्या उपाय योजना करणे या कामाकरिता सदरचा निधी वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. सदर बोअरचे काम दि. ५ एप्रील २०१६ च्या आत करणेस मान्यता देणेत येत आहे.

१०२ नगरसेवकांचे वॉर्डात प्रत्येकी दोन बोअर व ५ स्विकृत नगरसेवक सुचवतील अशा ठिकाणी प्रत्येकी दोन बोअर मारणेस मान्यता देणेत येत आहे. प्रस्तावात वर नमूद केलेप्रमाणे कार्यवाही ठेवणेस मान्यता देणेत येत आहे आणि पाणी टंचाई निवारणकरिता ज्या ज्या उपाय योजना करावे लागतील अशी सर्व कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४४७ ठ. क्र. ३४८
दि. ९/३/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



प्र.क्र. २८ अ मधील सलगर वस्ती येथील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव प्रस्तावात नमूद रस्त्याचे डांबरी करणे कामाचे सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र. ०१/२०१५-१६ र.रु. ३८,९१,३८५/- याकामी सन २०१५-१६ अंदाजपत्रकातील भांडवली कामे रस्ते बांधणे या बजेट सदरातून र.रु. ३९.०० लाख इतकी बजेट तरतूद होवून मिळणेकामी मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. १०-३-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सदरचे पूर्वगणनपत्रक क्र. ०१/२०१५-१६ र.रु. ३८,९१,३८५/- यांस मान्यता देणेत येत असून, याकामी सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.४४१ ठ. क्र.३२८ दि. १८/३/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



जननी आणि मातृभूमीपासून व्यक्तीला कधीही अलग करता येत नाही या उक्तीप्र सोलापूरच्या भूमीत जन्मलेली भुमीपूत्रे महाराष्ट्र राज्याचा राज्य कारभार करीत महाराष्ट्रा विकासाला नवी दिशा देण्याचे काम करीत आहेत. महाराष्ट्र राज्याच्या विकासाची धुरा सांभा असताना, विकासापासून मागे पडलेल्या सोलापूर शहराला पून्हा एकदा गतवैभव प्राप्त क देण्यासाठी प्रशासकीय पातळीवर काम करणा-या अधिका-याकडूंन जास्तीत जास्त सोलापूर निधी देऊन या ठिकाणचे गेलेले वैभव कसे प्राप्त करुन देता येईल या दृष्टीने सातत्याने प्रय करीत आहेत. सोलापूर शहराचा केंद्र सरकारच्या स्मार्ट सिटीसह या ठिकाणी येणा-या नवन विविध प्रकल्पांना कोणतीही आडकाठी येऊ नये यासाठी हे अधिकारी स्वतः प्रयत्न करीत आहे अशा या सोलापूरचे भूमीपूत्र असणा-या १) आदरणीय स्वाधिन क्षत्रिय साहेब, राज्याचे मु सचिव २) आदरणीय प्रविणसिंह परदेशी साहेब, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ३) आदरण मिलींदजी म्हैसकर साहेब, मुख्यमंत्र्यांचे सचिव ४) आदरणीय मनिषा म्हैसकर मॅडम नगरविका सचिव ५) आदरणीय दत्ता पडसलगीकर पोलीस आयुक्त मुंबई या सोलापूरच्या सुपूत्रांचा सोला महानगरपालिकेच्या वतीने जाहिर सत्कार करण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता दे येत आहे.

तसेच आदरणीय मा. डॉ. श्रीकर केशव परदेशीसाहेब, केंद्र शासन व आदरणी मा. आनंद कुलकर्णी, निवृत्त अतिरिक्त मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन यांचाही जाहिर सत्का करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४४२ ठ. क्र. ३५० 
दि. १८।३।१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



स्वतंत्र भारताच्या संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्या घटनाकारामुळे लोकशाहीतील न्यायव्यवस्था प्रभावीपणे राबविली जात आहे. त्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा सोलापूर जिल्हा न्यायालयाच्या परिसरात असावा अशी पी.जी.प्रतिष्ठान सामाजिक संस्था यांची व तमाम सोलापूर शहरवासियांची इच्छा आहे. १४ एप्रिल २०१६ महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती असल्याने, ती मोठया उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजन समाजाच्या उध्दारासाठी जे महान कार्य केले आहे ते लोकांना सदैव प्रेरणादायी ठरण्यासाठी सोलापूर शहरातील तमाम जनतेच्या भावनांचा आदर ठेवण्यासाठी सोलापूर न्यायालयाच्या आवारात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारणेस महाराष्ट्र शासनाकडे शिफारस करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४४३ ठ. क्र. ३५२
दि. १८।३।१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



माय, सोलापूर सामाजिक संघटना, सोलापूर यांचे वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती ही ऐतिहासिक सण म्हणून **समता यात्रा महोत्सव** या नावाने साजरी करण्यांत येणार आहे. त्याकामी सदर संघटनेने होम मैदान दिनांक १४ एप्रील २०१६ ते २४ एप्रील २०१६ अखेर भाडेतत्वावर मिळणेकामी विनंती केलेली आहे. तरी सदरची जागा ही माय सोलापूर सामाजिक संघटना सोलापूर यांना मनपा नियमाप्रमाणे दि. १४ एप्रील २०१६ ते २४ एप्रील २०१६ अखेर नाममात्र भाडयाने सदरची जागा देणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/~~प्रामुली~~/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ४४४ ठ. क्र. 342
दि. 9/3/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजना व सुधारणा कामे मजीप्रा मार्फत राबविणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सोलापूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजना राबविणेकरिता अधिक्षक अभियंता, मुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता (स्थापत्य), कार्यकारी अभियंता (यांत्रिकी/इलेक्ट्रीकल) या दर्जाचे अधिकारी आवश्यक असून, सद्यस्थितीत सदरची पदे सोमपाकडे उपलब्ध नसल्याने सोलापूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजना शासनाकडून राबविणेची (मजीप्रासारख्या तज्ञ यंत्रणेकडून) सूचना मा. विभागीय आयुक्त यांनी दिलेले आहेत. तसेच सदरची योजना राबवित असताना शासन स्तरावरुन अनेक प्रकारचे मंजूरी घेणे आवश्यक असून योजनेचा सुधारीत आराखडा (Revised DPR) तयार करणे गरजेचे असून त्याकरिता मजीप्राची नेमणूक करणे आवश्यक आहे.

मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३४०, दिनांक ८-३-२०१६ नुसार सोलापूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजना मनपा मार्फत राबविणेस तसेच सदर योजना राबविणेकरिता मा. महाराष्ट्र शासनाकडील कार्यकारी अभियंता या दर्जेचा अधिकारी महापालिकेकडे मजीप्रा कडून मागविणेबाबत मान्यता देण्यांत आलेली असून, सदरच्या ठरावाबाबत मजीप्रासारख्या तज्ञ शासकीय यंत्रणेकडून योजना राबविणेस फेर निर्णय होऊन ठराव पारित होणेस व प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे आणि सोलापूर शहर वाढीव पाणी पुरवठा सुधारणा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण किंवा अन्य सक्षम शासकीय यंत्रणेमार्फत राबविणेकरिता तसेच एनटीपीसी कडील र.रु. २५० कोटी मनपा हिस्सा एनटीपीसी मार्फत मजीप्राकडे वर्ग अथवा शासनाकडे वर्ग करणेस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दिनांक १४-३-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

मा. विभागीय आयुक्त, पुणे यांचेशी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने सोलापूर शहराची वाढीव पाणीपुरवठा योजना याकामी रिवाईज्ड् डीपीआर तयार करणे आणि सदरची योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत राबविणेस तसेच एनटीपीसी कडील र.रु. २५० कोटी म.न.पा. हिस्सा एनटीपीसी मार्फत मजीप्रा कडे वर्ग अथवा शासकनाकडे वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. याकामी डी.आय. पाईपचा वापर करणेत यावा.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका